MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३७/२००९ दिनांक :

प्रति,

श्री. भिमाण्णा रेवणाप्पा जमखंडी,
मु.पो. जाडरबोबलाद, ता. जत, जि. सांगली अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली.

**कोरम :**–१) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. एस.आर.बांबळे, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ०३.०८.२००९

सदर प्रकरणामध्ये सुनावणीच्यावेळी मा.अध्यक्ष त्यांच्या कांही कामामुळे हजर नव्हते. त्यामुळे सदरचे प्रकरण सदस्य सचिव श्री. एस.आर.बांबळे व ग्राहक सदस्य श्री. जी.सी. लेले असे दोघांपुढे सुनावणीसाठी घेतले अशावेळी नियमाप्रमाणे सदस्य सचिव यांनी सुनावणीचे कामकाज पाहिले.

श्री. भिमाण्णा रेवणप्पा जमखंडी ( ग्रा.त.नि.मंच प्रकरण ३७/२००९) यांचे जाडरबोबलाद, ता. जत, जि. सांगली येथे १७.५.१९९७ पासून असलेली ३ अश्वशक्ती वीज जोडणीचे भारमध्ये ( ३ + २ एचपी ) वाढ करुन मिळणे करिता वि.प.कडे प्रकरण दिले. त्यानुसार वि.प.ने बिलींग सुरु केले. दरम्यान वि.प.ने मे २००८ मध्ये जोडणीचे भार तपासणी करण्याच्या नावाखाली त्यांची जोडणी तपासली व फॉर्मवर तक्रारदार निरक्षर असल्यामुळे वि.प.ने भारमधील वाढ दोन ऐवजी साडेचार एचपी अशी नोंद केल्याचे समजले. या बाबत वि.प.कडे लेखी तक्रार करण्यात आली. तक्रारदाराची वीज बिलाची कोणतीही थकबाकी नव्हती. डिसेंबर २००८ तिमाही अखेरचे बील रु १७८९३.६३ वि.प.कडून देण्यात आले. सदर अचानक आलेले मोठ्या रकमेचे बील मान्य नाही, विद्युत नियामक आयोगाचे विनियमाचे कृति मानके, वीज पुरवठा अटी, तरतुदीनुसार तसेच झालेल्या मानसिक त्रासापोटी वि.प.कडून भरपाई मिळावी अशी त्यांची मागणी आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे क्ष नमुन्यात प्रकरण क्र. ८५७ दि. २७.२.२००९ ने दाखल केले होते. त्यावर कक्षाने सुनावणी घेवून आदेश पत्र क्र. ४४३९ दि. २६.५.२००९ नुसार निकाल दिला आहे. सदर निकाल मान्य न झालेमुळे अर्जदाराने मंचाकडे दि. २२.५.२००९ रोजी अपील दाखल केले आहे. त्यानुसार मंचाने कारवाई अंतर्गत वि.प.चे संबंधित अधिकाऱ्याकडून मुद्देनिहाय माहिती मागविली व सुनावणी दिनांक २२.६.२००९ व १.७.२००९ रोजी कोल्हापूर येथे झाली. सदर सुनावणीवेळी तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे व वि.प.तर्फे श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग, श्री. दिवटे, सहा.अभियंता, उप विभाग संख व श्री. कोळी, उच्चस्तर लिपीक, जत उप विभाग इ. हजर होते.

<u>तक्रारदार यांचे म्हणणे</u>

तक्रारदार यांचे १९९७ पासून ३ अश्वशक्ती शेतीपंपाची वीज जोडणी जाडरबोबलाद , ता जत, जि. सांगली येथे आहे व ते त्यावर येणारी वीज बीले भरत आलेले आहेत व वीज जोडणीवर कोणत्याही प्रकरची थकबाकी नाही. दि. १२.९.२००६ ला त्यांनी ३+२ जोडणीच्या भारामध्ये वाढ मिळावी या करिता वि.प.कडे अर्ज दाखल केला. त्यावर वि.प कडून कार्यवाही होऊन कंपनीने ५ अश्वशक्ती नुसार बिलींग सुरु केले. दरम्यान वि.प.ने भार तपासणी करणेचे निमित्ताने तक्रारदार यांची वीज जोडणी तपासणी व फॉर्मवर अंगठा घेतला. निरक्षर असलेमुळे अंगठा घेण्याचे कारण समजले नाही. परंतु प्रत्यक्षात वाढीव भाराची मागणी धरुन ५ अश्वशक्ती ऐवजी साडेसात अश्वशक्ती एकूण भार नोंदविले गेल्याचे दिसून आले. दरम्यान हि बाब दि. १.६.२००८ ला मडग्याळ शाखा कार्यालयास तसेच दि. १९.११.२००८ ला सांगली ग्रामीण विभाग कार्यालयास अर्जाने कळविली. त्या अर्जावर कार्यकारी अभियंता, सांगली ग्रामीण यांनी संख कार्यालयाच्या सहाय्यक अभियंता यांना तक्रारीची शहानिशा करणेस सूचना देणारा शेरा नंतर मारला आहे.

तक्रारदार यांनी दि. ११.८.२००८, २.१२.२००८ ला प्राप्त झालेली साडेसात अश्वशक्तीनुसार आलेली बीलेही भरली आहेत. त्यानंतर ३०.९.२००८ ते ३१.१२.२००८ या तिमाही काळाचे रु. १७८९३.६३ रकमेच्या थकबाकीचे बील मिळाले व ते भरले नाही. या बाबत कायदेशीर तक्रार खालील प्रमाणे

१) महाराष्ट्र वीज नियामक आयोग विनियम नुसार मंजूर भारात कपात होणेचा परिणाम दुसरे बिलींग चक्रात न मिळणे.

२) आचार संहिता वीज पुरवठा अटी १४ : ३ प्रमाणे मीटर नोंदी न होणे

३) अचानक मिळालेल्या अवास्तव रकमेच्या बिलाचा तपशील नसणे व चुकीची थकबाकी माफ व्हावी.

४) कृति मानके पालन झाले नसलेने नुकसान भरपाई मिळावी

५) मानसिक त्रासापोटी वितरण कंपनीने रु. ५०००/– अदा करावेत.

वितरण कंपनीचे म्हणणे

श्री. भिमण्णा रेवण्णा जमखंडी यांना दि. १७.५.१९९७ ला जुना शेती क्र. ५३४ ने शेती पंप वीज जोडणी दिली आहे. ग्राहकाने दि. १२.९.२००६ ला ५ अश्वशक्तीची मोटर खरेदी करुन बसविली हे वस्तुस्थितीस धरुन नाही. ग्राहकास ३ अश्वशक्तीचे वीज बील देयक सप्टेंबर २००७ पर्यंत देण्यात आले आहे. तक्रारदाराने वीज जोडणीच्या भारामध्ये वाढ करण्या करिता कोणताही अर्ज सादर केलेला नाही, तर तक्रारदाराने कृषी स्वाभीमान योजनेत स्वत:हून अर्ज व हमीपत्र भरुन दिलेले आहे व त्या अंतर्गत सदर योजनेच्या अटीनुसार ठरविलेल्या दंडाची रक्कम भरणेची लेखी हमी भरुन दिली आहे. त्यामुळे त्याचा जादा विद्युत भार अधिकृत करुन देण्यात आला आहे. ग्राहकाचा मूळ अधिकृत भार ३ अश्वशक्ती होता व ग्राहकाने भरुन दिलेला अर्ज व हमीपत्र हे मूळ अ.श. अधिक ४.५ अ.श. असा एकूण साडेसात अश्वशक्ती करिता आहे. त्यावेळी लागू असलेल्या कृषी स्वाभीमानी योजनेप्रमाणे ग्राहकानी जोडून घेतलेला अनधिकृत जादा भार अधिकृत करुन घेणेकरिता दंड रक्कम भरण्याची हमी भरल्यानंतरच दंडाची रक्कम रु. १८०००/– होते व ही रक्कम जास्त असल्याची तक्रारदाराची तक्रार आहे. रक्कम वाढीव व अवास्तव असल्याची ग्राहकाची तक्रार अयोग्य आहे. वितरण कंपनीने कागदपत्रांवर ग्राहकाचा अंगठा घेतला नाही तर ग्राहकाने स्वत:हून कंपनीस दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन कार्यालयाने कार्यवाही केली आहे. नंतर दि. १.६.२००८ रोजी ५ अश्वशक्तीची मोटर वापरत असल्याची खातरजमा ग्राहकाच्या तक्रार अर्जावरुन वि.प.ने केली आहे व त्यानुसार १.६.२००८ पासून साडेसात ऐवजी ५ अ.श.प्रमाणे बील दुरुस्त करुन देण्यात आलेले आहे. तसेच दि. १५.११.२००८ ला ग्राहकाच्या मागणीप्रमाणे वीज जोडणीला मीटर बसवून मीटर पध्दतीने बिलींग सुरु करण्यात आले आहे.

१) तक्रारदाराचे अर्जानुसार विद्युत देयके दिलेमुळे मंजूर भारात कपात दुसरे देयक चक्रारे आत सोडवणे लागू होत नाही.

२) दि. १५.११.२००८ ला वीज जोडणीला मीटर बसवून रिडींग प्रमाणे देयक देण्यात आले आहे त्यामुळे या कलम क्र. १४:३ लागू होत नाही.

३) तक्रारदाराने कृषी स्वाभीमान योजनेअंतर्गत दिलेला अर्ज व हमीपत्रानुसार अनधिकृत वापर अधिकृत करणेसाठी दिलेले बील अवास्तव किंवा जास्त नसून योग्य आहे – सदर थकबाकी चुकीची नाही.

४) कृति मानके – अटीचे पालन झाले आहे व तक्रारदारास मानसिक त्रास देण्यात आलेला नाही त्यामुळे नुकसान भरपाई रु. ५०००/– देण्याचा प्रश्न येत नाही असे वितरण कंपनीतर्फे म्हणणे मांडण्यात आले.

सदस्य सचिव यांचा निष्कर्ष

तक्रारीचे अवलोकन केले असता, उपलब्ध कागदपत्रांनुसार तक्रारदार यांनी वितरण कंपनीने जाहीर केलेल्या कृषी स्वाभीमान योजनेअंतर्गत त्यांचे वीज जोडणी क्र. २७०५१०३६२००१ (जुना क्र. ५३४) वर अनधिकृत जादा भार वापरीत असलेवरुन त्यांनी स्वयंस्फूर्तीने चालू ३ अ.श. भार अधिक अनधिकृत जोडलेला साडेचार अश्वशक्ती भार असे एकूण साडेसात अश्वशक्ती भार नियमित करुन घेण्यासाठी अर्ज व हमीपत्र भरुन देवून स्वत:च्या अंगठ्यानिशी वि.प.ला दिलेले दिसते.

तक्रारदार यांचे म्हणण्याप्रमाणे वीज जोडणीला प्रत्यक्षात बसविलेली मोटर पंप ५ अ.श. आहे व त्यास दि. १२.९.२००६ ची मोटर खरेदीची पावती सादर केली आहे व तसा (३ +)२ अ.श. वाढ मिळण्या करिता वि.प.कडे अर्ज केलेला आहे. परंतु वि.प.कडे त्यावेळी अर्ज दाखल केल्याची कागदपत्रें किंवा पोहोच पुरावे तक्रारदाराने सादर केलेले नाहीत. त्यामुळे तसा अर्ज केला किंवा नाही हे सिध्द होत नाही. ग्राहकाने दाखल केलेले ५ अ.श. मोटर पंप व इतर साहित्य खरेदी केलेची पावती ही कॅश मेमो नसून दरपत्रक आहे व ते मागील तारखेने सहज उपलब्ध होणे शक्य आहे.

तक्रारदार यांनी प्रत्यक्ष वाढीव भारासह एकूण ५ अ.श. ऐवजी साडेसात अश्वशक्ती कागदोपत्री नोंद झाला. या बाबतचा विषय व त्यानुसार वि.प.शी झालेला पत्र–व्यवहार हा २००६ मध्ये न करता जून २००८ पासून पुढील काळात केलेचे कागदपत्रांवरुन दिसते.

कृषी स्वाभीमान योजनेअंतर्गत अनधिकृत शेती पंपाचा जोडलेला भार नियमित करुन घेण्या करिता शासनाने सन २००७ मध्ये योजना जाहीर केलेली होती व त्या अंतर्गत रु.३६००/– प्रति अश्वशक्ती प्रमाणे ग्राहकाचे मागणीप्रमाणे अनधिकृत साडेचार अश्वशक्ती म्हणजेच ५ अ.श. वाढीव भाराचे एकूण रु. १८०००/– डिसेंबर २००८ च्या बिलामध्ये आकारण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे.

तक्रारदाराने उपस्थित केलेल्या कृति मानके विनियमातील तरतुदीनुसार भार वाढ/ कपात दुसरे चक्राचे आतने सोडविणे, मिटरच्या नोंद न घेता देयक देणे, अचानक थकबाकीचे बील देणे, विनियम कलम १५:४ नुसार ३ महिन्यांचे सरासरी बील देणे तसेच मानसिक त्रासापोटी रु. ५०००/– मिळावेत इ. मागण्या तक्रारीतील मुद्द्यांना लागू होत नसल्याने ग्राह्य धरता येत नाही.

सदर तक्रार मंचाकडे दाखल झालेनंतर वितरण कंपनीकडून तक्रार प्रकरणाबाबत अधिक तपशील जमविणे असलेमुळे दोन महिन्यानंतर निकालपत्र देण्यात येत आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रें, युक्तीवाद इ. विचारांत घेवून सदस्य सचिव यांचेतर्फे खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराचे अपील फेटाळण्यात येत आहे

२) तक्रारदाराने स्वयंस्फूर्तीने केलेल्या वि.प.चे कृषी स्वाभीमानी योजने अंतर्गत अनधिकृत विद्युतभाराचे मंजुरीसाठी अर्जानुसार रु. १८०००/– वि.प.कडे भरणा करावेत.

३) भरपाईबाबत आदेश नाही.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(एस.आर.बांबळे)

दिनांक : सदस्य सचिव

ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

श्री. जी.सी. लेले, ग्राहक सदस्य :